

# दुधाळ जनावरांचा कासदाह आजार : कारणे व प्रतिबंधात्मक उपाय



दुधाळ जनावरांच्या कासेची निगा राखणे अतिशय महत्त्वाचे आहे. दुधाळ जनावरांची गुणवत्ता ही तिच्या कासेवर अवलंबून असते. कास हा दुध उत्पादनाच्या दृष्टीने महत्त्वाचा अवयव आहे. जास्त दुध देणाऱ्या गाई-म्हशीत कासदाहाचे प्रमाण अधिक असते. या आजारामुळे दूध उत्पादनात लक्षणीय घट होते. कासदाह या आजारात कासेला सूज येते, तिचे सर्व बाजूने आकारमान वाढते. कासेस हात लावल्यास ती गरम लागते. या आजारात दुधाचा रंग बदलणे, दुध फुटणे, लहान लहान गाठी येणे, पू-मिश्रित वा रक्ताच्या गाठी येणे व शेवटी कास घट्ट दगडासारखी बनून दुधाऐवजी पाण्यासारखा पिवळा द्राव येणे ही लक्षणे दिसतात. या आजारामुळे दूध उत्पादनात दुधातील स्निग्धांशात लक्षणीय घट होते. गोठ्यातील अस्वच्छता, सदोष व्यवस्थापन, मल-मूत्राचा योग्य निचरा नसणे, कासेची अस्वच्छता, कासेच्या व सडांच्या जखमांकडे दुर्लक्ष इत्यादी कारणांमुळे रोगजंतुंचा प्रवेश गाई-म्हशींच्या कासेत होतो. कासेत रोगजंतूंची झपाट्याने वाढ होते, पुढे कासेतील पेशीत व दुधात संसर्ग होतो.

अगदी सुरूवातीच्या काळात कासेवर नकळत सूज, थोडासा गरमपणा व किंचित दुधात घट अशी लक्षणे दिसतात. हीच कासदाहाची सुरवात असते. त्याला सुप्त कासदाह म्हणतात. या स्थितीत दुधात बाह्यस्वरूपी कोणतेही बदल दिसून येत नाही; मात्र या स्थितीत कासेचा आजार लक्षात आल्यास व त्याचे निदान झाल्यास, योग्य औषधोपचाराने हा आजार बरा होऊ शकतो. यापुढील टप्प्यात कासेत शिरलेल्या रोगजंतूंना अटकाव न झाल्याने तो पुढील काळात फोफावतातो, कासेचा दाह होऊन दूध दूषित बनते.

**प्रतिबंधात्मक उपाय :**

पशुपालकांनी दररोज दूध काढताना दुधाचे निरीक्षण करावे. दुधात दिसणारे बदल व होणारी घट याकडे बारकाईने लक्ष दिल्यास हा आजार टाळता येईल. तळ हातावर, काळी काचपट्टी यावर दुधाच्या धारा घेतल्यास, गाठी, रक्तांश, पू, रंगातील बदल इ. ताबडतोब लक्षात येतात. बाजारात मिळणारा सामूदर्शक कागद (पीएच पेपर) वापरून दुधाच्या अल्कतेची परीक्षा करावी.

कासदाह चाचणी (कॅलिफोर्निया मस्टायटीस टेस्ट) मिश्रण व प्लॅस्टिकचे उपकरण (चौपाळा) बाजारात उपलब्ध आहे. याच्या सहाय्याने कासदाह चाचणी करुन घ्यावी. प्रत्येक सडातील पहिल्या दोन-चार धारा काढून मग प्रत्येक कप्प्यात संबंधित सडातून साधारणत: दोन ते तीन मि.ली. दुधाचा नमुना घ्यावा. त्यात समप्रमाणात कासदाह चाचणी मिश्रण टाकावे. चौपाळ्यातील दूध व द्रावण न सांडता गोलाकार हालचालीने त्वरित मिसळावे. मिश्रण चिकट स्त्रावाचे वा जेलीसारखे घट्ट वाटल्यास त्वरित पशुवैद्यकाचा सल्ला घेऊन ताबडतोब उपचार सुरू करावेत. कासदाह होऊ नये यासाठी दूध काढताना कासेची वेळोवेळी तपासणी करावी.

प्रकाशन
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, संशोधन अनुदान अंतर्गत

धार काढण्यापूर्वी जनावराची कास स्वच्छ व कोमट पाण्याने धुऊन स्वच्छ मऊ कपड्याने पुसावी. शक्य असल्यास पोटॅशियम परमँगनेटच्या पाण्याने कास धुवावी. रोगजंतूंचा प्रसार दूध काढताना होत असतो, हे लक्षात ठेवावे. दूध काढणाऱ्या व्यक्तीची वैयक्तिक स्वच्छता, दोहनापूर्वी हात-पाय स्वच्छ धुणे, निर्जंतुकीकरण, नखांद्वारे कासेस जखमा होऊ न देणे ही काळजी घ्यावी.

गाई-म्हशीच्या कासेला झालेल्या जखमांतून रोगजंतू कासेत प्रवेश करतात, त्यामुळे कासेच्या जखमेवर ताबडतोब इलाज करावा. अंगठा मुडपून दोहन पद्धत टाळावी, त्यामुळे सडास इजा होते. संपूर्ण हाताने दूध काढणे सर्वात उत्तम. दूध काढण्याची प्रक्रिया सात ते आठ मिनिटांत संपवावी. कासेतील दूध संपूर्णपणे काढावे. कासेत दूध राहिल्यास त्यात रोगजंतू वाढून कासेचा दाह होतो.

दूध काढण्यास सोपे जावे म्हणून बऱ्याचदा पशुपालक पहिली धार हात ओले करण्यास वापरतात. पहिल्या धारेत रोगजंतुंचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे पहिल्या तीन-चार धारा संकलित करू नयेत. दूध संकलनाच्या वेळी हाताला थुंकी लावू नये. थुंकीद्वारे रोगजंतूंचा प्रसार कासेत होऊ शकतो. दुध काढायचे यंत्र अथवा भांडे यांची स्वच्छता ठेवावी.

दोहनापूर्वी प्रत्येक सड जंतुनाशकामध्ये २० ते ३० सेकंद बुडवावा, त्यामुळे सडांचे व कासेचे आरोग्य चांगले राहते. दूध काढल्यानंतर सडांचे निर्जंतुकीकरण (डिपकप) करावे. हिवाळ्यात कासेवर, सडांवर भेगा पडतात व त्यातून रोगजंतूंचा शिरकाव होतो, त्यासाठी हिवाळ्यात जंतुनाशक मलम किंवा चांगले तूप लावावे.

दोहनानंतर वासरास बरोच वेळ पिऊ दिल्यास, दूध संपल्यानंतर वासरू सडांना चावा घेते त्यामुळे जखमा होतात, त्यातून कासदाह होऊ शकतो.गोठे नेहमी स्वच्छ, कोरडे, मुलायम पृष्ठभागाचे व हवेशीर असावेत. मल-मूत्रातील रोगजंतूंमुळे कासेचा दाह होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. गोठ्यात खड्डे असल्यास कासेस जखमा होतात व पुढे त्यातून दाह होतो.

दुधाळ जनावर विकत घेताना कासदाह चाचणी परीक्षा करावी. प्रत्येक सडाच्या दुधाची चाचणी स्वतंत्रपणे साधारणत: दोन-तीन आठवड्यांच्या अंतराने करत जावी, त्यामुळे कासदाह रोगाचे निदान प्राथमिक अवस्थेत होऊन पुढील नुकसान टळेल. अधिक दूध देणाऱ्या गाई-म्हशींना आटवताना अचानक दूध काढणे बंद करू नये, अशामुळे कासदाह होऊ शकतो.

दुधाळ जनावर संपूर्णपणे आटण्याच्या शेवटच्या दिवशी चारही सडांत पशुवैद्यकाच्या सल्ल्याने प्रतिजैविकाची ट्यूब चढवावी. अशा औषधोपचाराने पुढील वेतात कासदाह होण्याची शक्यता कमी होते. दोहनाच्या वेळा निश्चित असाव्यात. प्रथम निरोगी जनावराचे दूध काढावे. कासेचा दाह झालेल्या जनावराचे दूध शेवटी काढून ते नष्ट करावे.

दूध संकलनानंतर साधारणत: तीस ते पंचेचाळीस मिनिटे सडांची छिद्रे संपूर्णपणे बंद होत नाहीत. या काळात गोठ्यातील रोगजंतू कासेत प्रवेश करू शकतात, त्यामुळे दूध संकलनानंतर निदान एक तास तरी जनावर उभे राहील अशी व्यवस्था असावी. दोहनानंतर जनावरांना चारा टाकावा.

पशुतज्ज्ञांच्या सल्ल्याने जनावरांना प्रतिकारशक्ती वाढविणारी औषधे द्यावीत. कासदाह प्रतिबंधक औषधांचा वापर नियमित केल्यास कासदाह टळतो. जुनाट कासदाह असलेली जनावरे गोठ्यातून काढून टाकावीत. दररोजच्या दुधाची नोंद काटेकोरपणे ठेवावी म्हणजे दुधातील घट ताबडतोब लक्षात येईल. दुधाबद्दल शंका वाढल्यास त्वरीत कासदाह चाचणी करुन पशुवैद्यकाचा सल्ला घ्यावा.


www.mafsu.in

**✻ मार्गदर्शक ✻**

www.knpcvs.in

**कर्नल प्रा. (डॉ.) ए. एम. पातुरकर**
मा. कुलगुरु, मपमविवि, नागपुर

**डॉ. एस. व्ही. उपाध्ये**
अधिष्ठाता, पशुविज्ञान विद्याशाखा,
मपमविवि, नागपुर

**डॉ. एन. व्ही. कुरकुरे**
संचालक संशोधन,
मपमविवि, नागपुर

**डॉ. ए. यु. भिकाने**
संचालक विस्तार शिक्षण,
मपमविवि, नागपुर

**डॉ. व्ही. डी. आहेर**
सहयोगी अधिष्ठाता
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

**✻ संकलन ✻**

**डॉ. स्मिता आर. कोल्हे**
संशोधन प्रकल्प प्रमुख, पशुवैद्यकीय व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

संपर्क : टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३२६८ सकाळी १० ते सायं. ६ वा.